# ।। स्वरूप-सोपान-सोऽहम् ।।



दिनांक १५ ऑगस्ट १९७४ रोजी श्रीस्वरूपानंद स्वामीजी संजीवन समाधिस्थ झाले. तत्पूर्वी ३० जुलै रोजी श्रीस्वामीजींनी सत्यदेवानंद सरस्वतींना खोलीत बोलावून घेतले. त्याकाळात श्रीस्वामींनी डोळ्यांवर पट्टी ठेवली होती. ती काढून श्रीस्वामीजींनी सत्यदेवानंदांकडे कृपादृष्टीने पाहिले. सेवेकऱ्याकडून खडीसाखर प्रसाद घेऊन नित्याप्रमाणे सत्यदेवानंद मागल्या पावली (श्रीस्वामीजींकडे पाठ न फिरविता) खोलीतून बाहेर आहे. हळूहळू देहभान लोप पावत आहे अशी जाणीव सत्यदेवानंदांना झाली व ते बाहेर ओटीवर आसन घालून बसले. कानात श्रीस्वामीजींचे शब्द उमटले '**आपण भजन करावे, पुष्कळ भजन करावे. तेच आपले जीवन आहे**'. श्रीस्वामीजी सोऽहम् अनुसंधानास '**भजन**' म्हणत असत हे तर सर्वज्ञातच आहे. म्हणूनच

वरप्रार्थनेत श्रीस्वामीजी म्हणतात '**उदारा जगदाधारा देई मज असा वर । स्व-स्वरूपसंधानी रमो चित्त निरंतर ।।**'

गुरुकृपांकिताने नेहमी स्मरणात ठेवावे की,

१. सद्गुरु नित्य आहेत.

२. सद्गुरुंनी दिलेला बोध हा परंपरेने आलेला व स्वानुभवसिद्ध असतो, त्यामुळेच तो शिष्यांस प्रदान केला जातो.

३. साक्षात् आत्मानुभवी सद्गुरूमुखांतून आल्यामुळे तो शक्तियुक्त असून त्यास सत्संकल्पाचे व परंपरेचे बळ असते.

४. आत्मानुभवाच्या साधनपथावर त्या बोधाव्यतिरिक्त/ त्या साधनेव्यतिरिक्त इतर कसलीही वा जोडसाधनेची आवश्यकता नसते.

५. जेव्हा पारंपारिक पद्धतीने अनुग्रह देऊन सद्गुरु शिष्याचा स्वीकार करतात तेव्हा '**एकनिष्ठ**' शिष्याची संपूर्णत: जबाबदारी सद्गुरुंनी घेतलेली असते. व्यावहारिक रीतीने त्याचा वाणीद्वारे उच्चार करुन ते सांगण्याची त्यांना आवश्यकता नसते.

६. कर्मसिद्धान्त अटळ व अबाधित असल्याने शिष्य जीवनात संत/सद्गुरु सहसा ढवळाढवळ करीत नाहीत, अन्यथा ते शिष्याच्या मोक्षमार्गाआड येते.

७. आत्मदर्शन वा आत्मानुभव म्हणजे आणखी काहीही नसून जीवास स्वत:चे म्हणजे स्व-स्वरूपाचे जे विस्मरण झालेले आहे त्याचा पुन: बोध होणे.

८. अंती **'माझे मजपाशी सापडले धन । आनंदले मन आत्मरंगी ।।'** अशी अवस्था होते.

ही सर्व अकृत्रिम, सहजपणे, पण क्रमश: अन् बहुतांश जीवांच्या बाबतीत हळूहळू घडणारी प्रक्रिया आहे. फारच थोडे भाग्यवान् जीव सद्‌गुरु बोध कानी पडताच तत्क्षणीच ज्ञानी होतात. आध्यात्मिक साधनेचे विविध प्रकार वा मार्ग आढळतात, नाना संप्रदाय व व्यक्ति तितक्या प्रकृति. त्यामुळे ज्याला जो मार्ग रुचेल तो त्याने स्वीकारावा. **पण ज्या साधनमार्गात इतर कुठल्याही आलंबनाची आवश्यकता नाही, जी साधना नैसर्गिक, सहज आहे, जी देश-काल-परिस्थितीवर अवलंबून नाही अशी साधनाच श्रेष्ठ व सोयीस्कर आहे यांबद्दल वाद वा दुमत नसावे. अशा निसर्गदत्त साधनेने परमोच्च अवस्था साध्य होऊ शकते हे नाथसंप्रदायाने दाखवून दिले.** नाथसंप्रदायातील नाथांच्या साधनमार्गाच्या, कठोर तपाचरणाच्या व चमत्कारांच्या कथा फार पुरातन काळातल्या आहेत, आज ते सर्व शक्य नाही असा भ्रम असणाऱ्यांसाठी आताच्या काळातील श्री स्वामी स्वरूपानंदांचे उदाहरण मार्गदर्शक ठरेल. श्रीगुरूप्रणित सोऽहम् साधनेद्वारे केवळ, श्रीस्वामींनी ती परमोच्च स्थिति, ते परमोच्च पद हस्तगत केले. हा आदर्श सर्व साधकांनी ध्यानी घेण्याजोगा आहे. श्रीमद्‌भगवद्गीता आणि

श्रीज्ञानेश्वरी यांची मानवी मूर्ति म्हणजे श्रीस्वामी स्वरूपानंद! स्वधर्म-परायणता व स्वकर्म-दक्षता, सोळाव्या अध्यायातील दैवी गुणसंपदा वा सहाव्या अध्यायातील योगीलक्षणे व सिद्धि, बाराव्या अध्यायातील भक्त लक्षणे या सर्वांची मूर्तिमंत परिणति म्हणजे श्री स्वामी स्वरूपानंद दर्शन! श्रीस्वामीजींचे जीवनचरित्र, भक्तस्मृतिप्रसंग व लीलाप्रसंग वाचताना हे सहज ध्यानी येईल. थोडासा जरी विचार केला तरी यांतील एकेक गुण अंगी बाणवायचा म्हणजे किती सायासकर आहे याची कुणासही कल्पना येईल. एखादेवेळी तंत्रमंत्र अनुष्ठानाद्वारे सिद्धिप्राप्ति सहज होईल पण हे गुण अंगी बाणवणे महत्कठीण! रामचंद्र विष्णू गोडबोले ते स्वामी स्वरूपानंद हा जीवनप्रवास आज सर्वांसमोर उपलब्ध आहे, त्यात काहीही गुप्त नाही. अन् या स्थित्यंतराचा सोपान म्हणजे केवळ गुरुपदिष्ट सोऽहम्!

याच सोऽहम् साधनेचे मार्गदर्शन श्रीस्वामींनी आपल्याकडे आलेल्या प्रत्येक जिज्ञासूला केले व अव्यक्तातून आजही करीत आहेत. आज आपण जगाच्या पाठीवर कुठेही असू, पण श्रीक्षेत्र पावस येथील श्रीस्वामीजींच्या खोलीतील पवित्रता, गंभीरता, प्रसन्नता, नि:शब्दता स्मरणक्षणीच अनुभवू शकतो हे खरे आहे नां? हेच श्रीस्वामींचे सामर्थ्य, सर्वव्यापकता व अमरत्व आहे. बोधप्रदान करतेसमयीची त्यांची तळमळ आपण अल्पांशानेसुद्धा जाणू शकत नाही. श्री रामकृष्ण परहंस म्हणत की **'माझं म्हणणं मानतोय कोण? मी सोबती धुंडाळतोय -माझ्या स्वभावाचा, मनोभावाचा. कुणी खूप भक्त दिसल्यास वाटू लागतं की हा बहुधा माझा भाव घेऊ शकेल. पण नंतर दिसू लागतं की तो वेगळंच वागू लागतो!.'** नीट विचार केल्यास

कळेल  की सर्वच गुरूंच्या मनी आज हीच खंत असेल, नाही का? प्रत्यक्ष ब्रह्मसाम्राज्याचा सोपान असलेला हा सोऽहम्, पण एखाद्या अजाण बालकाच्या हाती एखादे बहुमोल रत्न दिले तर त्यांस जसे त्याचे मोल कळत नाही तशी तर आज आपली स्थिति होत नाही नां?

या सोऽहम् बोधाचे मर्म सर्व जिज्ञासू साधकांस अवगत व्हावे अशी आज श्रीस्वामी पुण्यतिथिदिनी श्रीस्वामीचरणी प्रार्थना करुया.

******

-- सुदेश चोगले (१५.०८.२०१५)

या निमित्ताने श्रीस्वामीजींच्या श्रीमत् संजीवनी गाथेतील काही अभंगांचे अवलोकन करणे योग्य ठरेल.

**सद्‌गुरु गणनाथ उदार समर्थ । घाली नयनांत ज्ञानांजन ।।१।।**
**सहज-समाधि सांपडलें धन । लाचावलें मन तया ठायीं ।।२।।**
**चालतां बोलतां न ढळे आसन । न भंगे तें मौन कदा काळीं ।।३।।**
**स्वामी म्हणे लाभे अवीट आनंद । लागलासे छंद स्वरूपाचा ।।४।। (अभंग क्र. ५)**

*   *   *

**नको वेदाभ्यास करावा सायास । उपास-तापास देह-दंड ।।१।।**
**नको धूम्र-पान पंचाग्नि-साधन । नको तीर्थाटन काशी गया ।।२।।**
**नको मंत्र-तंत्र जप-जाप्य अर्चा । वेदान्ताची चर्चा करावया ।।३।।**
**अखंड अंतरी सहज-स्फुरण । तेथें ठेवीं मन स्वामी म्हणे ।।४।। (७१)**

*   *   *

अंतरी स्वानंद असे स्वयंसिद्ध । परि मति-मंद भोगी चि ना ॥१॥

समाधी-निधान असतां सन्निध । झालासे मोहांध पाहे चि ना ॥२॥

अखंड भजन चाले रात्रं-दिन । तेथें सावधान राहे चि ना ॥३॥

सद्‌गुरुवांचून नाहीं आत्म-ज्ञान । जाईना शरण स्वामी म्हणे ॥४॥ (७२)

* * *

निर्भय निश्चिंत निवांत निरार्त । रतलेंसे चित्त हरिपायीं ॥१॥

सांडिला संसार व्हावया उद्धार । केली सारासार-विचारणा ॥२॥

हरि-कृपाबळें लाधला सत्संग । सांपडला मार्ग स्वानंदाचा ॥३॥

स्वामी म्हणे मज आकळलें गुज । देखिलें सहज आत्म-रूप ॥४॥ (४)

* * *

पडे त्यासी पडो विश्वाचें हें कोडें । आम्हांसी उघडें आत्म-रूप ॥१॥

एक आत्म-रूप सर्वत्र संचलें । नाहीं त्यावेगळें दुजें कांहीं ॥२॥

जळीं स्थळीं काष्ठीं पाषाणीं संपूर्ण । आत्म-रूप जाण प्रकटलें ॥३॥

आत्म-रूप दृष्टि आत्म-रूप सृष्टि । आत्मा पाठीं-पोटीं स्वामी म्हणे ॥४॥ (७४)

* * *

पूर्ण हरि-कृपा-बळें । विश्वरूप म्यां देखिलें ॥१॥

आता ठेवूं कोठें पाय । हरि-रूप लोक-त्रय ॥२॥

रिता नाहीं कोठें ठाव । जेथे पाहें तेथें देव ॥३॥

स्वामी हरिसी अभिन्न । अवघा हरि परिपूर्ण ॥४॥ (३४)

* * *

कृपावंत भला सद्‌गुरु लाभला । अंगीकार केला तेणें माझा ॥१॥

अंतरींची खूण दाखवोनी मज । सोऽहं-मंत्र गुज सांगितलें ॥२॥

ठायीं चि लागली अखंड समाधि । संपली उपाधि अविद्येची ॥३॥

स्वामी म्हणे देव सर्वत्र संचला । संसार तो झाला मोक्ष-मय ॥४॥ (१७)

* * *

**हरि-रूप कर्म हरि-रूप धर्म । भक्तीचें हें वर्म स्वामी म्हणे ।।४।। (क्र. १)**

*** * ***

**शब्दांचे पांडित्य कल्पनेच्या गोष्टी । वाउगी चावटी करूं नये ।।१।।**

**तेणे पोटीं उठे दंभ अभिमान । आत्म-समाधान दूर राहे ।।२।।**

**गोडी कळावया द्यावा गूळ खाया । देव ओळखाया स्वानुभव ।।३।।**

**स्वामी म्हणे नाहीं पांडित्याचें काम । स्वयें आत्माराम दाखवावा ।।४।। (९)**

*** * ***

**जीवा-शिवाचा संयोग । हाचि माझा राजयोग ।।१।।**

**भेद-भाव हारपला । हरि एकला संचला ।।२।।**

**दूर झाली आधी-व्याधी । लागे अखंड समाधि ।।३।।**

**स्वामी बैसला स्व-स्थानीं । हरि-रूप ध्यानीं मनीं ।।४।। (१४)**

*** * ***

**प्राणाचा प्रणव सहज पवन-जय । झाला गगनीं लय गगनाचा ।।२।।**

**स्वामी म्हणे गेला द्रष्टा-दृश्य-भाव । कोंदाटला देव अंतर्बाह्य ।।४।। (१६)**

*** * ***

**हरीचें चिंतन करी रात्रं-दिन । वाउगा तो क्षण जावों नेदी ।।१।।**

**चालतां बोलतां जेवण जेवितां । सदा देतां घेतां, हरि-ध्यान ।।२।।**

**आसनीं शयनीं एकांती लोकांती । आठवीं श्री-पति अखंडित ।।३।।**

**स्वामी म्हणे नित्य हरीचें दर्शन । तेणें समाधान परिपूर्ण ।।४।। (२२)**

*** * ***

**स्वामी म्हणे प्रतिक्षण । आत्मरुपीं अनुसंधान ।।५।। (३७)**

*** * ***

**गुरु-कृपेविण आकळे ना खूण । व्हावें सावधान स्वामी म्हणे ।।४।। (४५)**

*** * ***

वेद-वेदांताचें संपादुनी ज्ञान । देतसे व्याख्यान लोकांपुढे ।।१।।

अद्वैत-वेदांत मांडितो सिद्धांत । देउनी दृष्टांत नानाविध ।।२।।

भला थोर ज्ञाता ऐसी कीर्ति होतां । आला स्वर्ग हाता ऐसें वाटें ।।३।।

स्वामी म्हणे नाहीं आत्म-समाधान । व्यर्थ अभिमान पांडित्याचा ।।४।। (५३)

* * *

बैसे अधांतरी उभा अग्नीवरी । सांगे देशांतरी काय चालें ।।१।।

बोलें तें तें घडे ऐसे चि रोकडे । दावी लोकांपुढे चमत्कार ।।२।।

वश केल्या सिद्धी पावला प्रसिद्धि । लागली उपाधि लौकिकाची ।।३।।

स्वामी म्हणे नाही आत्म-साक्षात्कार । काय चमत्कार दावोनियां ।।४।। (५४)

* * *

स्वामी म्हणे जना कृत्रिमाची गोडी । नसे चि आवडी स्वाभाविकीं ।।४।। (५५)

* * *

बाळकाची भूक कळे माउलीतें । बोलावुनी देते स्तन-पान ।।१।।

तैसें माझें हित जाणे जगन्नाथ । तेणें मी निश्चिंत सर्वकाळ ।।२।।

भाव-बळें देव आपुलासा केला । कृपाळु तो भला सांभाळितो ।।३।।

स्वामी म्हणे खेळ खेळतो लडिवाळ । खेळवी गोपाळ प्रेम-भरें ।।४।। (५९)

* * *

गुरुकृपेविण नाहीं आत्म-ज्ञान । वाउगा तो शीण साधनांचा ।।१।।

सहज-साधन गुरु-कृपा जाण । जीवाचें कल्याण तेणें होय ।।२।।

गुरु माता पिता गुरु चि देवता । गुरु मुक्ति-दाता ऐसें मानीं ।।३।।

गुरु-सेवेवीण जावों नेदीं क्षण । तेणें तो प्रसन्न स्वामी म्हणे ।।४।। (६५)

* * *

माझें मजपाशीं सापडलें धन । आनंदलें मन आत्म-रंगी ।।१।।

सोडवेना मज नित्य नवी गोडी । सेवितों आवडी ब्रह्म-रस ।।२।।

सन्निध तें परी होतें दुरावलें । गुरु-कृपा-बळे आंगवलें ।।३।।

प्राणाचा प्रणव मनाचें उन्मन । होतां समाधान स्वामी म्हणे ।।४।। (८८)

* * *

मन हे चंचळ धावे वाऱ्यावरी । तयासी आवरीं अभ्यासाने ।।१।।

विषयांचे सुख नाशिवंत देख । अविनाशी एक आत्म-रूप ।।२।।

ऐसा सारासार करावा विचार । सार तें साचार दाखवावें ।।३।।

स्वामी म्हणे मना आत्म-सुखीं गोडी । लावितां आवडी स्थिरावेल ।।४।। (८९)

* * *

देतसे व्याख्यान सांगे ब्रह्म-ज्ञान । पोटीं अभिमान पांडित्याचा ।।१।।

स्वानुभवाविण डोलवुनि मान । वंचितो आपण आपणातें ।।२।।

वाउगा तो शीण वृथा शब्द-ज्ञान । नाहीं समाधान अंतर्यामीं ।।३।।

स्वामी म्हणे नाहीं बाणली विरक्ति । तरी आत्म-प्राप्ति कैसी होय ।।४।। (९९)

* * *

कां गा मना होसी दु:खी कष्टी खिन्न । तुज काय न्यून सांगे मज ।।१।।

दु:खाचे कारण पाहे विचारून । बुद्धीसी शरण जावोनियां ।।२।।

विषयांचा संग देई सुख-दु:ख । अनित्य ते देख होती जाती ।।३।।

स्वामी म्हणे व्हावें नित्य समाधान । तरीं करीं ध्यान स्व-रूपाचें ।।४।। (११५)

* * *

कृपावंत थोर सद्‌गुरु उदार । तेणें योग सार दिलें मज ।।१।।

मन-पवनाची दाखवोनी वाट । गगनाशीं गांठ बांधियेली ।।२।।

शून्य-नि:शून्याचें बीज महा-शून्य । भेटविलें धन्य हरि-रूप ।।३।।

स्वामी म्हणे माझा नाथ-संप्रदाय । अवघें हरिमय योग-बळें ।।४।। (१२२)

* * *

काय सांगू संत-कृपेचा नवलाव । प्रकटला देव अंतर्यामीं ।।१।।

सोऽहं सोंऽहं ऐसा नित्य निदिध्यास । लागला जीवास आपेंआप ।।२।।

लिहितां वाचितां बोलतां बैसतां । देतां घेतां खातां हिंडतां हि ।।३।।

तिन्ही अवस्थांचा झालों साक्षीभूत । राहिलों निवांत स्वामी म्हणे ।।४।। (१२९)

* * *

एक चि हरि-रूप सर्वत्र संचलें । व्यापुनी राहिलें त्रैलोक्यासी ।।१।।

एक हरिविण दुजें नाहीं काहीं । जीव-जगत् पाहीं मायाजन्य ।।२।।

मिथ्या माया जाण मिथ्या नाम-रूपें । एकला स्वरूपें हरि नांदे ।।३।।

व्याप्य ना व्यापक वाच्य ना वाचक । एक तें नि:शंक स्वामी म्हणे ।।४।। (१३७)

* * *

निवडावे जैसे हंसे क्षीर-नीर । तैसें सारासार विचारावें ।।१।।

नामरूपात्मक जग हें मायिक । अविनाश एक आत्म-पद ।।२।।

आत्म-पदीं द्यावी बुडी निश्चयाची । आसक्ति देहाची सांडोनियां ।।३।।

असोनि संसारी घ्यावें आत्म-सुख । तरी चि सार्थक स्वामी म्हणे ।।४।। (१४७)

* * *

करीं गा निष्काम स्वकर्माचरण । नामसंकीर्तन विठ्ठलाचें ।।१।।

आत्म-निरीक्षण किंवा धरीं ध्यान । स्वीकारीं साधन आवडे तें ।।२।।

साधनीं निमग्न राहें रात्रं-दिन । तेणें होय जाण चित्त-शुद्धि ।।३।।

होतां चित्त-शुद्धि लाभे आत्म-ज्ञान । ज्ञानें समाधान स्वामी म्हणे ।।४।। (१४९)

* * *

अंतरी संतत करीं सोऽहं ध्यान । न जाई गुंतून संसारात ।।१।।

धन सुत दारा असूं दे पसारा । नको देऊ थारा आसक्तीतें ।।२।।

होवो हानि-लाभ पावो सुख-दु:ख । न सोडीं विवेक साक्षित्वाचा ।।३।।

स्वामी म्हणे राहें देहीं उदासीन । पाहें रात्रं-दिन आत्म-रूप ।।४।। (१५०)

* * *

नाथ-संप्रदायी आम्ही कानफाटे । जाऊं नका वाटे आमुचिया ।।१।।

मन-पवनाची घालोनियां गांठ । करूं वाताहात संसाराची ।।२।।

देहासवें पुसूं लौकिकाचे नांव । नेदूं उरों ठाव जीवासी हि ।।३।।

स्वामी म्हणे तुम्हां बुडवूं महा-शून्यीं । गगनासी आटणी होय जेथें ।।४।। (१६७)

* * *

अंतरी भजन चालें रात्रं-दिन । तेणे समाधान अनिर्वाच्य ।।१।।

नित्य नाम-जप होतो आपेंआप । तया सुखा माप कोण करी ।।२।।

शब्दाविण ध्वनि करोनि श्रवण । ठेवीं अनुसंधान आत्म-रूपीं ।।३।।

स्वामी म्हणे खूण घ्यावी ओळखून । संतांसी शरण जावोनिया ।।४।। (१७१)

* * *

सोऽहं सोऽहं ध्यास लागतां जीवास । होतसे निरास संमोहाचा ।।१।।

त्रिगुणाचें भान हारपे मीपण । होतां सोऽहं ध्यान निरंतर ।।२।।

अंतीं एकमय ध्याता ध्यान ध्येय । होतां ज्ञानोदय अंतर्यामीं ।।३।।

स्वामी म्हणे मग स्वानंदाचा भोग । होय तो हि साङ्ग सुख-रूप ।।४।। (१७६)

* * *

संतांसी सद्भावें करोनि प्रणिपात । कांहीं आत्म-हित विचारावें ।।१।।

काय ती विरक्ति कैसी आत्म-स्थिति । ज्ञानाची प्रचीति कैसी होय ।।२।।

कैसी हरि-भक्ति कैसी शरणागति । नामाची महती कैसी काय ।।३।।

स्वामी म्हणे संत दावितील खूण । घ्यावी ओळखून ज्याची त्यानें ।।४।। (१७८)

* * *

क्षणोक्षणीं हा चि करावा विवेक । काय तें मायिक काय सत्य ।।१।।

नाम रूप गुण मिथ्या नाशिवंत । एक तें शाश्वत आत्म-पद ।।२।।

विषयाचें सुख नश्वर मायिक । तेथें अरोचक असों द्यावें ।।३।।

स्वामी म्हणे माळ घालिते विरक्ति । बळावतां प्रीती आत्म-रूपीं ।।४।। (२०२)

* * *

बैसोनि एकांतीं करीं सोऽहं ध्यान । तेणें तुझें मन स्थिरावेल ।।१।।

'सोऽहं' 'सोऽहं' ऐसा शब्दाविण जप । होतां आपेंआप चित्त-शुद्धि ।।२।।

कैसा शब्दाविण होतो 'सोऽहं-ध्वनि' । घेई विचारोनि संतांपासीं ।।३।।

स्वामी म्हणे जाई संतांसी शरण । तेणें उद्धरण होय तुझें ॥४॥ (२१६)

* * *

घेई घेई जीवा स्व-रूपाचा ध्यास । पुरे हा हव्यास प्रपंचाचा ॥१॥
विटे ऐसी गोडी नव्हे स्व-रूपाची । सांगती ऐसें चि साधु-संत ॥२॥
संतांचे वचनीं ठेवोनि विश्वास । करीं गा अभ्यास आवडीने ॥३॥
स्वामी म्हणे भावे भोगी आत्मानंद । अवीट अखंड शांति-रूप ॥४॥ (२३५)

* * *

तुझे देह भिन्न माझे देह भिन्न । ऐसा हा अभिमान कासयासी ॥१॥
एक चि अभिन्न आत्म-तत्व पाहीं । द्रष्टा दृश्य नाहीं भाव जेथें ॥२॥
चार हि देहांचा करोनी निरास । उन्मनीपदास गांठीं बापा ॥३॥
स्वामी म्हणे जिणें तरी चि सफळ । ना तरी केवळ भारभूत ॥४॥ (२४३)

* * *

श्वासोच्छ्वासीं देख राम-नाम-जप । होतो आपेंआप अखंडित ॥१॥
तेथें रात्रं-दिन ठेवीं अनुसंधान । सांडुनी मीपण सोऽहं-भावे ॥२॥
राम-नामीं चित्त रंगतां स्वानंदें । सुखें होता चढे तत्त्व-बोध ॥३॥
होतां तत्त्व-बोध लाभे परा शांति । जीवासी विश्रांती स्वामी म्हणे ॥४॥ (२४८)

* * *

कुणाचें हि न चले बळ । कर्म तैसें भोगी फळ ॥ (१७०)

* * *

गुरु तो चि देव ऐसा ठेवीं भाव । सद्गुरु-गौरव काय वानूं ॥१॥
तो चि ज्ञान-मूर्ति ब्रह्मानंद-स्थिति । देई परा शांति भाविकातें ॥२॥
भक्ति-भावें जातां तयासी शरण। होते ओळखण स्व-रूपाची ॥३॥
स्वामी म्हणे वंदीं सद्गुरु-पाउलें । भलें आकारलें पर-ब्रह्म ॥४॥

******